Vol II Issue V Nov 2012

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

# Monthly Multidiciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 5, Nov. 2012
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# खाजगीकरण आणि महाराष्ट्रातील सहकाराची आजची परिस्थिती - एक अभ्यास

साळवे जे.एम

. (अर्थशास्त्र विभागप्रमुख)
मु.सा.काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि.पुणे.

***सारांश :***

महाराष्ट्रातील आजच्या सहकारी चळवळीची परिस्थिती अत्यंत विदारक आहे, या परिस्थितीला अनेक कारणे आहेत ही कारणे राजकीय, सामाजिक परिस्थितीशी निगडीत आहेत. महाराष्ट्रात सहकार चळवळ ज्या उदात्त हेतूने सुरू झाली तो हेतू पूर्ण अंशाने साध्य झाल्याचे दिसत नाही. याचे महत्त्वाचे कारण सहकार तत्त्वांचा सहकार नेत्यांना पुर्णपणे विसर पडलेला आहे. आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने व्हिएन्ना, ऑस्ट्रिया येथील परिषदेत खुले आणि ऐच्छिक सभासदत्व, लोकशाही व्यवस्थापन, सभासदांचा आार्थिक सहभाग, स्वायत्तता आणि स्वातंत्र्य, सहकार-प्रशिक्षण, सहकरांतर्गत सहकार ही सहा तत्त्वे सांगीतली तसेच **1995** मध्ये मॅचेस्टर येथील परिषदेत 'सामाजिक जबाबदारी' हे सातवे तत्व निश्चित केले. या सात सहकार तत्त्वांचा आणि महाराष्ट्रातील आजच्या सहकारी चळवळीचा अनुबंध तपासणे गरजेचा आहे. जेणेकरून महाराष्ट्रातील आजच्या सहकारी चळवळीचे निश्चित स्वरूप लक्षात येईल.

***प्रस्तावना :***

महाराष्ट्र राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे होत असताना ज्यावेळी आपण राज्याच्या विकाससंदर्भात विश्लेषण करतो त्यावेळी शतकपूर्ण केलेली सहकारी चळवळ ही अभिमानाने सांगण्याची गोष्ट आहे. शेती आणि ग्रामीण विकास यात सहकारी चळवळीचे महत्त्वर्ण योगदान आहे. पण साम्यवादी अर्थव्यवस्थेत आर्थिकवृध्दी वेगाने होत नाही हे भारताच्या **1980** च्या दशकात लक्षात आले. त्यामुळे नव्वदच्या दशकात भारताचे आर्थिक धोरण मुक्त अर्थव्यवस्थेकडे झुकू लागले त्यातूनच खाजगीकरण, उदारीकरणाकडे आपली वाटचाल सुरू झाली. मुक्त अर्थव्यवस्थेकडे झुकणारे आणि खाजगीकरणाला अधिक वाव देणारे नवीन आर्थिक धोरण जाहीर झाल्यापासून नव्या अर्थव्यवस्थेत सहकारी चळवळीचे स्थान काय राहील? व सहकारी चळवळीची वाटचाल कशी असेल? असे प्रश्न निर्माण होणे स्वभाविक आहे. त्या अनुषंगाने विश्लेषण व मीमांसा करण्याचा माझा प्रयत्न आहे.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागापासून शहरापर्यत सहकारी संस्थाचे जाळे तयार झाले. महाराष्ट्राच्या विकसाचे व प्रगतीचे खूप मोठे स्वप्न सहकाराने दाखविले होते पण हे सहकारी संस्थाचे संपूर्ण जाळे राजकीय पुढा-यांनी स्थापन केले आहे किंवा बहुतांशी सहकारी संस्था राजकारण्यांशी संबंधित आहेत. त्यामुळे राजकीय व आर्थिक घटकांची वीण सहकारी संस्थात खूप पक्की बसलेली आहे. या संस्था काबीज करून आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करणे, तसेच या संस्थांचा उपयोग करून राजकीय सत्ता हस्तगत करणे, यात सहकाराच्या मूळ संकल्पनेलाच हरताळ फासला जात आहे. सहकारी बॅका, सहकारी दुग्धसंस्था, सहकारी गृहनिर्माण संस्था, सहकारी पतसंस्था, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था अशा अनेक संस्था शेतक-यांच्या विकसासाठी, उन्नतीसाठी स्थापन करण्यात आल्या. या संस्थांच्या माध्यमातून शेतक-यांचा, ग्रामीण महाराष्ट्राचा आर्थिक, सामाजिक, संस्कृतिक, शैक्षणिक विकास करून समाजाचा उद्धार करणे ही प्रमुख उद्दिष्टये जुन्या राजकीय पुढा-यांची होती. जे राजकीय नेते गांधी विचाराने प्रभावित झाले होते तोपर्यत ही उद्दिष्टये काही प्रमाणात साध्यही झाली. पण आज राजकारणाचे एकूण अध:पतन झाले आहे, त्यामुळे राजकारण व सहकार दोन्हींचीही अधोगतीकडे वाटचाल सुरू आहे.

संपूर्ण राज्यात **34** जिल्हा सहकरी बॅका, **28** हजार प्राथमिक पतसंस्था, **650** नागरी सहकारी बॅका, **202** साखर कारखाने, हजारो स्वयंसेवी संस्था व गृहनिर्माण संस्था या सर्व संस्थामध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष काम करणारे सुमारे **11** कोटी कर्मचारी आहेत. या मधील काही मोजक्याच संस्था सोडल्या तर अनेक संस्था भ्रष्टाचारामुळे, भोंगळ कारभारामुळे तोटयात व डबघाईस आलेल्या आहेत. तर काही संस्था मोडून काढून त्याचे खाजगीकरण करण्यात आले आहे. राज्यात एवढे मोठे सहकाराचे जाळे आहे. त्याचे व्यवस्थापन करताना, आर्थिक - राजकीय घटकांना एकत्र बांधण्यासाठी एका सर्वसमावेशक धोरणाची आणि अंमलबजावणीची आवश्यकता आहे. ही गोष्ट सर्वच सहभागी घटकांच्या आर्थिक प्रगती करता आवश्यक असते. मात्र हे सर्व घडून येण्यासाठी जागृत, सक्षम व कणखर व्यवस्थापनाचीही गरज असते. राज्यामधील एकूण संस्थापैकी **50**टक्के संस्था या तोटयात आहेत. एखादी संस्था स्थापन करायची, ती तोटयामध्ये काढून बंद पाडायची नंतर कालांतराने तीच संस्था कवडीमोल दराने स्वतः विकत घ्यावयाची, विकत घेतानाही वापरलेला पैसा हा इतर मार्गाने आलेला असतो. हेच सहकारी साखर कारखान्याच्या बाबतीत झालेले आहे. अशीच परिस्थिती इतरही सहकारी संस्थामध्ये झालेली आहे. म्हणून सहकाराची पंढरी असलेल्या महाराष्ट्रामध्ये खाजगी साखर कारखान्यांचे पीक जोमने येऊपहात आहे.

आज पर्यत **250** ते **300** खाजगी साखर कारखाण्यांचे प्रस्ताव साखर आयुक्तालयात दाखल झालेले आहेत. त्यामधील **50** साखर कारखान्यांना मंजूरी देखील दिलेली आहेत. त्यातील **38** साखर कारखान्यांनी यंदा गाळप देखील केलेले आहे. **38** पैकी **30** साखर कारखाने हे राजकीय नेत्यांचे आहेत. उरलेले **8** कारखानेही राजकीय नेत्यांच्या संबंधितांचे आहेत. सध्या महाराष्ट्रात **202** सहकारी साखर कारखाने आहेत. त्यातील **141** साखर कारखाने चालू आहेत. उर्वरीत सर्वच बंद पडलेले आहेत. त्यात विशेष म्हणजे बंद असलेले कारखाने खासगी व्यक्तींना विकत घेण्यासाठी राज्यशासनाने नुकत्याच सादर कलेल्या अर्थसंकल्पात सवलतीची घोषणा केलेली आहे. त्यामुळे बंद असलेले सहकारी साखर कारखाने आता विक्रीला उपलब्ध आहेत. अशीच परिस्थिती इतरही संस्थाची होऊन बसली आहे. जिल्हयातील शेती विकासासाठी असणा-या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचीही लूट चालू आहे. काही राजकीय नेते अशा संस्था काढतात आपलेच नातेवाईक, मित्र यांची अध्यक्ष, संचालक, सचिव म्हणून नेमणूक करतात खोटे क्षेत्र दाखवून हजारो एकरावर खोटी कर्ज घेतात आणि संस्था डबघाईला आणतात. असेच अनाधिकृत

DSpace™

प्रकार इतरही सहकारी संस्थांमध्ये चालू आहेत . उदा . सहकारी दुग्ध संस्था, सहकारी गृह निर्माण संस्था . म्हणजेच सहकारी म्हणून संस्था स्थापन करावयाची नि बंद पाडून स्वत :च विकत घ्यावयाची हाच उद्योग विविध सहकारी संस्थांच्या मारेक-यांनी सुरू केलेला आहे . सहकारातून उद्धार हे सहकाराचे घोषवाक्य आहे . पण या उद्देशाला हरताळ फासला जात आहे . तसेच सहकारी बॅकाही डबघाईस येऊपहात आहेत . गावातील विकास सोसायटयांपासून ते राज्यातील राज्य सहकारी बॅकांपर्यत भ्रष्टाचाराची प्रकरणे उघड झालेली आहेत . सहकार क्षेत्रात आदर्श समजल्या जाणा-या राज्य सहकारी बॅकेची आर्थिक दिवळखोरी काढण्यात आली आहे . वास्तविक पहाता ही बॅकच एका राजकीय पक्षाच्या अधिपत्याखाली होती . त्यांच्याच छात्रछायेखाली भरमसाठ कर्जे वाटण्यात आली त्यांच्याच जवळच्यांनी राज्यसहकारी बॅकेला ब्रेक दिला . ढिसाळ, कमकुवत व्यवस्थापन आणि राजकीय हस्तक्षेप बाजूला केले असते तर बॅकांवर दिवाळखोरीची वेळच आली नसती . उद्या कुणीतरी उठेल आणि राज्य सहकारी बॅकच विकत घेईल, एवढी हिम्मत या नेत्यांच्या अंगात आलेली आहे . संस्था सुरू करताना सभासदांकडून भाग भांडवल गोळा करावयाचे, संस्था स्थापन झाली की, अवघ्या काही दिवसात त्या सभासदाला वा-यावर सोडावयाचे हीच संकल्पना सहकारामध्ये रूढ होत चालली आहे .

सध्या राज्यात **32** हजार **645** सहकारी दुग्ध संस्था आहेत . यामधील **43** टक्के दुग्ध संस्था या तोटयात आहेत . यावरून सहकारातील विदारक चित्र आपल्याला दिसते या संस्था बंद पाडण्याचे कारस्थान या पुढा-यांचेच आहे . कारण सहकारालाच खाजगीकरणाचा व्हायरस लागलेला आहे . सहकारच सत्ताधा-यांच्या दावणीला बांधलेला आहे . असे चित्र दिसू लागले आहे . आजचा राजकीय पुढारी सहकार मोडून काढून खाजगीकरणाचा उद्योग करू पहात आहे . राजकारण सहकार व उद्योग हे सुत्रच त्यांनी आंमलात आणले आहे . सहकारातून गैरमार्गाने मिळविलेला पैसा हा खाजगीकरणासाठी वापरला जात आहे . आणि तोच पैसा निवडणुका व इतर अवैध कार्यक्रमांसाठी वापरला जात आहे . याचाच अर्थ असा होतो की जनतेच्या पैशावर डल्ला मारून सहकार क्षेत्रातील राजकीय पुढारी हळुहळू श्रीमंत व बलाढय झालेले दिसतात . सहकाराचे खाजगीकरण करताना मोठ- मोठे उद्योगपतीही या पुढा-यांना मोलाचे सहकार्य करताना दिसतात . राज्यामध्ये सहकाराचे जाळे आहे, तसेच जाळे खाजगीकरणाचेही आहे . यामध्ये गरीब शेतकरी लुटला जातो, भरडला जातो आणि नाडलाही जातो . तसेच सहकार मोडून खाजगीकरण करायचे व त्याचा स्वार्थासाठी उपयोग करायचा असा प्रकार सध्या सूरू आहे . सहकारी संस्था मोडणा-यांवर अद्याप कोणतीही कारवाई झाली नाही व जरी काही मोजक्या लोकांवर झाली असली तरी ते याच्यातून सहीसलामत बाहेर पडलेले आहेत . सरकार एका बाजूला भ्रष्टाचाराचे निर्मुलन करण्याचा प्रयत्न करत आहे, तर दुस-या बाजूला जे लोक सहकारी संस्था मोडून काढत आहेत त्याच्याच तोंडात त्याच संस्था खाजगीकरणाच्या माध्यमातून घालत आहे . अशी परिस्थिती पहाता जनतेने जागृत होणे गरजेचे आहे . जनतेनेच खाजगीकरणाचा डाव उधळून लावला पाहिजे . महाराष्ट्राचा आर्थिक विकास करावयाचा असेल, महाराष्ट्राचे प्रगतीचे, आर्थिक, सास्कृतिक, शैक्षणिक समृध्दीचे स्वप्न पूर्ण करावयाचे असेल तर सहकार आणि राजकरण, सहकार आणि खाजगीकरण यासंदर्भात नव्याने विचार होणे व संशोधन गरजेचे आहे . सहकाराची तत्वे आणि आजची मतलबी राजकीय प्रवृती यांचाही नव्याने शोध घेणे गरजेचे आहे . अन्यथा ही समृध्द परंपरा असणारी सहकारी चळवळ इतिहास जमा होण्यास वेळ लागणार नाही असे माझ्यासारख्या अभ्यासकाला वाटते .

संदर्भ :-


1) Co-operation in India – Mamoria & Joahi

2) सहकार - प्रा . के . एम . भोसले ,प्रा डॉ . बी . एच . दामजी, फडके प्रकशन,कोल्हापूर तिसरी आवृती ऑगस्ट 2008 .

3) सहकार -डॉ . गंगाधर कायंदे-पाटील चैतन्य पब्लिकेशन, नाशिक प्रथम आवृती 10 जुन 2005 .

4) सहकाराचा विकास -भोसले, काटे .

5) सहकारी महाराष्ट्र विविध अंक .

6)सहकाराचा विकास -प्रा . मोहन सराफ व प्रा . रूपा शहा . फडके प्रकाशन,कोल्हापूर . प्रथम आवृती सप्टेंबर 1999 .

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net